# कार्यालय जिल्हा समादेशक होमगार्ड बुलडाणा

चिखली रोड, डी.एड कॉलेज समोर देवी मंदिराजवळ बुलडाणा

इमेल आय.डी. dchgbuldhana@yahoo.com दूरध्वनी क्रमांक 0762-242359

OFFICE OF THE DISTRICT COMMANDANT HOME GUARD BULDHANA

क्रमांक / 343 / होमगार्ड जाहीरात /2024 दिनांक 29 /07/2024

प्रति,

मा.जिल्हा माहिती अधिकारी,

बुलडाणा.

विषय :- होमगार्ड नोंदणीची बातमी प्रसिध्दी करणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये बुलडाणा जिल्हयातील पुरुष व महिला रिक्त होमगार्ड अनुशेष पूर्ण करणे करीता होमगार्ड नोदंणीचे आयोजन करण्यात येणार आहे. याची खालील प्रमाणे बातमी जिल्हयातील सर्व वृत्तापत्रामध्ये प्रसिध्दी करावी ही विनंती.

**-: प्रेस नोट :-**

बुलडाणा जिल्हा होमगार्ड दलात 133 पुरुष व 115 महिला असे एकुण -248 मानसेवी होमगार्डचा अनुशेष असून सदरचा अनुशेष भरुन काढणे करीता मानसेवी होमगार्ड नोंदणीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर होमगार्ड नोंदणी दिनांक 26/08/2024 पासून सुरु होणार असून त्यासाठी दिनांक 30/07/2024 ते 19/08/2024 अखेर सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत ऑन लाईन अर्ज मागविण्यात येत असून होमगार्ड नोंदणीचे माहिती पत्रक नियम व अटी बाबत विस्तृत माहिती http://maharashtra.gov.in./mahahg/log1.php या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तसेच होमगार्डमध्ये नोंदणी करु इच्छिणाऱ्या बुलडाणा जिल्हयातील रहिवासी उमेदवारांनी नोंदणीसाठी अर्ज करावा. तसेच सदर होमगार्ड नोंदणी पोलीस मुख्यालय कवायत मैदान बुलडाणा येथे वरील कालावधी पासून घेण्यात येणार आहे. असे आवाहन जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक, बुलडाणा यांनी केले आहे.

( बी.बी.महामुनी )

जिल्हा समादेशक होमगार्ड

तथा

अपर पोलीस अधीक्षक,

बुलडाणा

Mahabharti.in

Scanned with OKEN Scanner

**माहितीपत्रक -**

## - होमगार्ड संघटना -

**उददेश :-** देशातील जास्तीतजास्त नागरीकांना सैनिकी, तसेच आपतकालीन मदतकार्याचे , कायदा व सुव्यवस्था सुरळित राखण्याचे प्रशिक्षण देवून जबाबदार व शिस्तप्रिय नागरीक घडविणे हा होमगार्ड संघटनेचा उददेश आहे.

१. **होमगार्ड सदस्यत्व -** महाराष्ट्रातील होमगार्ड संघटना ही शासन संचलित पुर्णतः मानसेवी तत्वावर आधारीत आहे. या संघटनेचे सदस्य होणे म्हणजे कोणत्याही प्रकारची नोकरी अथवा रोजगार नाही. हे सदस्यत्व तीन वर्षांकरीता दिले जात असून आपण संघटनेसाठी दिलेल्या सेवेच्या गुणवत्तेवर पुढे ३ -३ वर्षांच्या टप्प्याने वयाच्या ५८ वर्षांपर्यंत पुर्णनोंदणीकृत करता येते. सदस्य नोंदणी करीता ठरविण्यात आलेले शैक्षणिक व शारीरीक चाचणी या पात्रतेचे निकष पुर्ण केल्यानंतर गुणवत्तेनुसार सदस्य म्हणुन निवड करण्यांत येते. निवड झाल्यानंतर प्राथमिक प्रशिक्षण पुर्ण करणे अनिवार्य आहे.

२. **होमगार्ड सदस्यांचे कर्तव्य -** होमगार्ड सदस्यांना दररोज कर्तव्य दिले जात नाही .
पोलीस दलाच्या मागणी प्रमाणे कायदा व सुव्यवस्था राखणे कामी पोलीस दलासोबत बंदोबस्त कर्तव्य,आपतकालीन परिस्थितीमध्ये अग्निशमन, विमोचन, पूरविमोचन तसेच रोगराई / महामारीकाळात , संपकाळात प्रशासनांस मदतकार्य अशी कर्तव्ये दिली जातात.

३. **होमगार्ड ना देय भत्ते :-** होमगार्ड सदस्यांना बंदोबस्त काळात प्रतिदिन रु. ५७०/- कर्तव्य भत्ता व रु. १००/- उपहारभत्ता दिला जातो. तसेच प्रशिक्षण काळात रु. ३५/- खिसाभत्ता व रु. १००/- भोजनभत्ता व साप्ताहिक कवायतीसाठी रु. ९०/- कवायत भत्ता दिला जातो.

४. **शास्ती -** होमगार्ड सदस्यांना दररोज कर्तव्य दिले जात नाही परंतू अत्यावश्यक प्रसंगी बंदोबस्त कर्तव्याकरीता विनाकारण अनुपस्थित राहणाऱ्या/ कर्तव्यामध्ये कसूर करणाऱ्या / आदेशांचे पालन न करणाऱ्या होमगार्ड सदस्यांवर मुंबई होमगार्ड अधिनियम १९४७ कलम ७(१) अन्वये बडतर्फ किंवा रु. २५०/- इतका दंड / तीन महीन्याची साधी कैद अशी शिक्षा करण्याची तरतूद आहे.

५. **होमगार्ड नोदणी -** होमगार्ड नोदणी करीता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही . सदस्यत्व मिळणेकरीता कोणत्याही इतर मार्गाचा (वशिला किंवा लाच) अवलंब करु नये. याकरीता कोणीही लाच /पैशाची मागणी केल्यास अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बुलडाणा किंवा मा. जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधिक्षक बुलडाणा यांचेशी संपर्क साधावा.

६. **होमगार्ड सदस्यत्वाचे फायदे -**

१. सैनिकी गणवेश परीधान करणेचा मान व विनाशुल्क सैनिकी प्रशिक्षण
२. ३ वर्षे सेवापुर्ण होमगार्डना राज्य पोलीस दल, वनविभाग, अग्निशमन दलामध्ये नोकरीमध्ये ५% आरक्षण.
३. प्रथमोपचार, अग्निशमन, विमोचन या सारख्या विवीध विषयांचे प्रशिक्षण घेण्याची संधी.
४. गौरवास्पद /उल्लेखनिय कामगिरी केल्यास विवीध पुरस्कार/पदके मिळविण्याची संधी.
५. स्वतःचा व्यवसाय/शेती इ. सांभाळीत देशसेवा करण्याची संधी.

Mahabharti.in

Scanned with OKEN Scanner

## होमगार्ड नोंदणी नियम व अटी

१. **होमगार्ड पात्रतेचे निकष :-**

अ) शैक्षणिक पात्रता - कमीत कमी १० वी उत्तीर्ण (SSC)

ब) शारिरीक पात्रता -

१. वय - २० वर्षे पुर्ण ते ५० वर्षांच्या आत. (दि. १९ /०८/२०२४ रोजी )

२. उंची - पुरुषांकरीता - १६२ से. मी. महिलांकरीता - १५० से. मी.

३. छाती - ( फक्त पुरुष उमेदवारांकरीता )

(न फुगविता किमान ७६ से.मी. कमीत कमी ५ सेमी फुगविणे आवश्यक )

क) आवश्यक कागदपत्र -

१. रहीवासी पुरावा - आधारकार्ड व मतदान ओळखपत्र (दोन्ही अनिवार्य )
२. शैक्षणिक अहर्ता प्रमाणपत्र
३. जन्मदिनांक पुराव्याकरीता SSC बोर्ड प्रमाणपत्र /शाळा सोडल्याचा दाखला.
४. तांत्रिक अहर्ता धारण करीता असल्यास तत्सम प्रमाणपत्र.
५. खाजगी नोकरी करीत असल्यास मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
६. ३ महीन्याचे आतील पोलीस चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र

२. **शारिरीक क्षमता चाचणी-**

**अ) धावणे**

| पुरुष उमेदवार | | महीला उमेदवार | |
|---|---|---|---|
| **१६०० मी. धावणे** | **२० गुण** | **८०० मी. धावणे** | **२५ गुण** |
| ५मि.१०सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | २० गुण | २मि.५०सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | २५ गुण |
| ५मि.१० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५मि.३० सेकंदापेक्षा कमी | १८ गुण | २मि.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि.००सेकंदापेक्षा कमी | २२ गुण |
| ५मि.३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५मि.५०सेकंदापेक्षा कमी | १६ गुण | ३मि.०० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि.१० सेकंदापेक्षा कमी | १८ गुण |
| ५मि.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६मि.१० सेकंदापेक्षा कमी | १४ गुण | ३मि.१० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि.२०सेकंदापेक्षा कमी | १४ गुण |
| ६मि.१० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६मि.३० सेकंदापेक्षा कमी | १२ गुण | ३मि.२० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि.३०सेकंदापेक्षा कमी | १० गुण |
| ६मि.३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६मि.५० सेकंदापेक्षा कमी | १० गुण | ३मि.३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि.४०सेकंदापेक्षा कमी | ०६ गुण |
| ६मि.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ७मि.१० सेकंदापेक्षा कमी | ०६ गुण | ३मि.४०सेकंदापेक्षा जास्त परंतु ३मि.५०सेकंदापेक्षा कमी | ०४ गुण |
| ७मि.१० सेकंदापेक्षा जास्त परंतु ७मि.३० सेकंदापेक्षा कमी | ०२ गुण | ३मि.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ४मि. पेक्षा कमी | ०२ गुण |
| ७ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त | ० गुण | ४ मि. ०० सेकंदापेक्षा जास्त | ० गुण |

Mahabharti.in

Scanned with OKEN Scanner

**ब. गोळाफेक** - पुरुष उमेदवारांकरीता .

| गोळाफेकीचे अंतर मीटर मध्ये | | |
|---|---|---|
| ८.५० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त | -- | १० गुण |
| ७.९० मीटर किंवा जास्त | ८.५० मीटरपेक्षा कमी | ०९ गुण |
| ७.३० मीटर किंवा जास्त | ७.९० मीटरपेक्षा कमी | ०८ गुण |
| ६.७० मीटर किंवा जास्त | ७.३० मीटरपेक्षा कमी | ०७ गुण |
| ६.१० मीटर किंवा जास्त | ६.७० मीटरपेक्षा कमी | ०६ गुण |
| ५.५० मीटर किंवा जास्त | ६.१० मीटरपेक्षा कमी | ०५ गुण |
| ४.९० मीटर किंवा जास्त | ५.५० मीटरपेक्षा कमी | ०४ गुण |
| ४.३० मीटर किंवा जास्त | ४.९० मीटरपेक्षा कमी | ०३ गुण |
| ३.७० मीटर किंवा जास्त | ४.३० मीटरपेक्षा कमी | ०२ गुण |
| ३.१० मीटर किंवा जास्त | ३.७० मीटरपेक्षा कमी | ०१ गुण |
| ३.१० मीटर पेक्षा कमी | - | ०० गुण |

**क. गोळाफेक** - महिला उमेदवारांकरीता .

| गोळाफेकीचे अंतर अंतर मीटर मध्ये | | |
|---|---|---|
| ६.०० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त | -- | १० गुण |
| ५.५० मीटर किंवा जास्त | ६.०० मीटरपेक्षा कमी | ०८ गुण |
| ५.०० मीटर किंवा जास्त | ५.५० मीटरपेक्षा कमी | ०६ गुण |
| ४.५० मीटर किंवा जास्त | ५.०० मीटरपेक्षा कमी | ०४ गुण |
| ४.०० मीटर किंवा जास्त | ४.५० मीटरपेक्षा कमी | ०२ गुण |
| ४.०० मीटर किंवा कमी | - | ०० गुण |

सुचना- i) उमेदवाराला जास्तीजास्त तीन संधी दिल्या जातील व त्यातील अधित्तम अंतर ग्राहय धरले जाईल.

ii) गोळा जर सिमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारांस नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील.

**ड. तांत्रिक अहर्ता गुण** -

| तांत्रिक अहर्ता एकुण गुण १० | अटींची पुर्तता केल्यास | गुण |
|---|---|---|
| १. आय टी आय (ITI) प्रमाणपत्र धारक | यापैकी १ अट पुर्ण करीत असेल तर | २ गुण |
| २. खेळामध्ये प्रविण्य मिळविलेल्या व्यक्ती. (जिल्हास्तरीय क्रिडास्पर्धामध्ये प्राविण्यप्राप्त) | यापैकी २ अट पुर्ण करीत असेल तर | ३ गुण |
| ३.माजी सैनिक (डिस्चार्ज कार्ड आवश्यक) | यापैकी ३ अट पुर्ण करीत असेल तर | ४ गुण |
| ४. एन.सी.सी. बी प्रमाणपत्र | यापैकी ४अट पुर्ण करीत असेल तर | ५ गुण |
| ५. एन.सी.सी. सी प्रमाणपत्र | यापैकी ५ अट पुर्ण करीत असेल तर | ७ गुण |
| ६. नागरी संरक्षण सेवेत परंतु स्थानिक ठिकाणी तीन प्रशिक्षण पुर्ण केलेले प्रमाणपत्र धारक | यापैकी ६ अट पुर्ण करीत असेल तर | ८ गुण |
| ७. जड वाहनचालक परवाना धारक | **सर्व अटी पुर्ण करीत असतील तर** | **१० गुण** |

- **शारिरिक क्षमता चाचणी पात्र ठरल्यानंतरच तांत्रिक अर्हतांचे गुण विचारात घेतले जातील**



Mahabharti.in

Scanned with OKEN Scanner

## नोंदणी अर्ज भरणे संदभातील सुचना

१. होमगार्ड नोंदणीचे अर्ज दि. **३० /०७/२०२४ ते १९ /०८/२०२४ या कालावधीमध्ये** https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentform.php या संकेतस्थळावर फक्त इंग्रजी या भाषेमधून भरावयाचा असुन अर्ज भरताना सर्व माहिती काळजीपुर्वक भरावयाची आहे. उदा. आधारकार्ड क्रमांक, जन्मदिनांक व्यवस्थित नोंद कराव्यात. एका उमेदवाराला आधारकार्ड क्र. च्या सहाय्याने एकदाच अर्ज दाखल करता येईल.

२. **उमेदवार ज्या भागातील रहीवासी आहे तो भाग ज्या पोलीस ठाणेच्या अंतर्गत येतो त्यांना त्याच पोलीस ठाणे अंतर्गत पोलीस ठाणे आणि पथकामध्ये त्याच जिल्हयात अर्ज दाखल करता येईल. इतर जिल्हयातील अर्ज बाद ठरतील.**

३. अर्ज **SUBMIT** केल्यावर Print Registration Form या मेनू मध्ये जावून त्याची छायांकीत प्रत काढावयाची आहे. त्यावर उमेदवारांनी भरलेला सर्व मजकूर छापून येईल . त्यावर आपला वर्तमानातील एक फोटा चिटकवावा, मराठी मधील नाव उमेदवारानी स्वत: पेनानी लिहावयाचे आहे . इतर कोणतीही माहिती उमेदवारानी भरू नये.

४. **ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. १९ /०८/२०२४ सायं. ५ वाजेपर्यत राहील** सर्व अर्जाची छाननी झालेनंतर कागदपत्र पडताळणी व शारिरिक क्षमता चाचणी करीता तारीख जाहीर करणेत येईल.

५. कागदपत्र पडताळणी व शारिरिक क्षमता चाचणी करीता येताना अ.क्र. १. क मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व आवश्यक कागदपत्रांच्या उमेदवारांनी स्वत: स्वाक्षरी केलेल्या छायांकित प्रति अर्जासोबत जोडाव्यात. अर्ज नोंदणीच्या दिवशी स्वत: घेवून यावे. दोन फोटो व मुळ कागदपत्र नोंदणीच्या वेळी पडताळणीकरीता बंधनकारक राहील.

६. उमेदवारांना नोंदणीकरीता स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल, नोंदणी दरम्यान किंवा प्रवासादरम्यान कोणतीही दुखापत झाल्यास त्याची सुपंर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

७. पात्र उमेदवारांची अंतिम निवड पथक निहाय रिक्त असलेल्या जागांनुसार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल. समान गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवाराच्या बाबतीत वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांस प्राधान्य दिले जाईल. तसेच वय समान असेल तर शैक्षणिक अहर्ता व तांत्रिक प्रमाणपत्रांच्या आधारावर निवड निश्चित करणेत येईल.

८. यापुर्वी होमगार्ड संघ्रटनेतून अकार्यक्षम/बेशिस्त ठरल्याने न्यायालयीन प्रकरणी दोषी असल्याने सेवासमाप्त केलेले होमगार्ड नोंदणीस अर्ज करणेस अपात्र ठरतील. मात्र स्वेच्छेने राजिनामा दिलेले होमगार्ड विहीत अटी पुर्ण करीत असतील तर अर्ज करणेस पात्र राहीतील

९: पुढील सुचना व अंतिम गुणवत्ता यादी याच संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

१०. पथक निहाय रिक्त जागा निश्चित करण्याचे सर्व अधिकार मा. जिल्हा समादेशक यांनी राखून ठेवले आहे.

११. अर्ज भरणेसंदर्भात काही अडचन असल्यास जिल्हा होमगार्ड कार्यालय बुलडाणा येथे ०७२६२-२४२३५९ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा

Mahabharti.in

Scanned with OKEN Scanner

**ऑनलाईन अर्ज खालीलप्रमाणे भरावा**

होमगार्ड विभागाच्या https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login१.php या संकेत स्थळावर जावुन HGs ENROLLMENT या मेनू मधून ONLINE ENROLLMENT FORM हा सबमेनू निवडावा.

१. सर्व प्रथम जिल्हा Select करावा .

२. त्यानंतर आपण ज्या पोलीस ठाणेच्या हददी मध्ये राहता त्या विभाग ज्या होमगार्ड पथकामध्ये येतो ते पथक आणि पोलीस ठाणे Select करावे. याकरीता खालील तक्ता पहावा.

| अ.क्र. | होमगार्ड पथक/उपपथक | अनुशेष | | अंतर्गत पोलीस ठाणे |
|---|---|---|---|---|
| | | पुरूष | महिला | |
| १. | बुलडाणा | 49 | 25 | बुलडाणा शहर,बुलडाणा ग्रामीण,बोराखेडी,धामणगांव बढे |
| २. | चिखली | 16 | 09 | चिखली,रायपुर,अमडापुर,धाड,साखरखेडा |
| ३. | देउळगांव राजा | 17 | 17 | देउळगांव राजा,सिंदखेड राजा,किनगांव राजा,अंढेरा |
| ४. | जळगांव जामोद | 04 | 09 | जळगांव जामोद,सोनाळा,तामगांव |
| ५ | खामगांव | 17 | 27 | खामगांव शहर, खामगांव ग्रामीण,शिवाजी नगर,शेगांव शहर,शेगांव ग्रामीण,पिळगांव राजा,हिवरखेड,जलंब |
| ६ | मलकापुर | 13 | 15 | मलकापुर शहर,मलकापुर ग्रामीण,एम.आय.डी.सी. ,नांदुरा |
| ७ | मेहकर | 17 | 13 | मेहकर,डोणगांव,जानेफळ,लोणार,बीबी |
| | एकुण अनुशेष | 133 | 115 | |

३. आपला १२ अंकी आधार क्र. काळजीपुर्वक भरावा. चुकीचा भरल्यास अर्ज बाद ठरविला जाईल.

४. यानंतर लिंग , पुर्ण पत्ता, शिक्षण , व्यवसाय , इमेल आयडी, ही माहीती काळजीपुर्वक भरावी.

५. वरील जाहीरातीमध्ये दिल्याप्रमाणे ज्या प्रकारची तांत्रिक अर्हता आहेत त्यांची संख्या Select करावी. ***( उदा. उमेदवार जड वाहन परवानाधारक ,प्राविण्यप्राप्त खेळाडू आणि NCC B प्रमाणपत्र धारक असेल तर तांत्रिक अर्हता संख्या तीन (Three) राहील)***

६. जन्मदिनांक , उंची (से. मी. मध्ये ) काळजीपुर्वक भरावी.

७. यापुर्वी होमगार्ड सेवेत असाल तर YES असे निवडावे. होमगार्ड सेवेतुन कमी केले असाल तर ज्या कारणास्तव कमी करणेत आले त्या आदेशाची प्रत सोबत जोडावी.

८. अर्ज SUBMIT केल्यावर आपण सरळ PRINT करण्यासाठीच्या Page वर जावे त्याठीकाणी आपला आधार क्र. आणि जन्मदिनांक भरुन आपल्या अर्जाची पहाणी करुन अर्जाची PRINT A4 पेपरवर काढावी व नोंदणी करीता येताना आवश्यक कागदपत्रांसह सादर करावी.

**कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सर्वर कनेक्टीवीटी मिळत नसल्यास कार्यालयीन वेळ वगळून अर्ज भरावा.**

Scanned with OKEN Scanner